**नियमित दिवाणी दावा क्र.३४/२०१९**
**पुष्पा वि. यादवराव**
**<u>निशाणी क्र.२८</u>**

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र.१ म्हणुन वादी पुष्पा लिलाधर बारमासे यांची उलटतपासणी प्रतिवादींचे अधिवक्ता श्री.एस.एम.नाफडे यांच्या मार्फत शपथेवर सुरु</u>.**

२५. तुळशीराम बनकर यांना एक मुलगा व चार मुली होत्या. साक्षिदार स्वताहुन सांगाते कि दोन मुली मरण पावल्या आहेत. माझे आजोबा तुळशीराम बनकर यांचा मृत्यु कधी झाला हे मला सांगता येणार नाही. तुळशीराम बनकर यांच्या मृत्यु समयी त्यांच्या किती मुली जिवंत होत्या हे मला सांगता येणार नाही. तुळशीराम बनकर यांच्याकडे अंदाजे १६ एकर शेती होती. मला तुळशीराम बनकर यांच्या शेताचे सर्वे क्रमांक सांगता येणार नाही. तुळशीराम बनकर यांच्याकडे तिन वेगवेगळया शेत्या होत्या. हे म्हणने खरे आहे कि, वाद शेती माझे आजोबा तुळशीराम यांच्याकडे कशी आली हे मी दाव्यात व शपथपत्रात नमुद केले नाही.

२६. तुळशीराम बनकर यांच्या मृत्युनंतर वाद शेतांचा प्रतिवादी क्र.१ हा मालक झाला. हे म्हणने खरे आहे कि, नि.क्र.३६ फेरफार नोंदवहीमध्ये तुळशीराम यांच्या मृत्युनंतर त्यांची मुले नामे यादवराव, देवकाबाई, सुमन व तानु हे त्यांचे वारस म्हणुन मालक झाल्याचे नोंद घेण्यात आलेली आहे. हे मला माहीती नाही कि देवकाबाई, सुमन व तानु यांनी त्यांच्या हिस्यात आलेली शेती प्रतिवादी क्र.१ च्या हिस्यात दिली किंवा कसे. मी देवकाबाई, सुमन व तानु यांच्यासोबत त्यांच्या शेतातील हिस्यांचे काय झाले याबाबत कधीही बोलली नाही. हे म्हणने खरे आहे कि, मी देवकाबाई, सुमन व तानु यांना सदर दाव्यामध्ये पक्षकार केलेले नाही.

**प्रतिवादींच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

सा. वा. दा. अ. ब. अ. क.केले                                   समक्ष

(पी. आर. पाटील)
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नरखेड, जि. नागपूर
दिनांक–१९.०८.२०२४

(पी. आर. पाटील )
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नरखेड, जि. नागपूर

## <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पि.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

**<u>लघुलेखकाचे नाव</u>**– अ.य.कुळकर्णी (श्रेणी–३)